# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.२५** **(महासभा)**

---

**विषय क्र.:- ०१** **प्रशासक ठराव क्र.:-१५६** **दिनांक :-१२/०९/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. दि.०९/०८/२०२४ शुक्रवार रोजी सकाळी- ११.३० वाजता संपन्न झालेल्या सभा क्र.२४ चे कार्यवृत्त कायम करणे.

**विषय :-** दि.०९/०८/२०२४ शुक्रवार रोजी सकाळी- ११.३० वाजता संपन्न झालेल्या सभा क्र.२४ चे कार्यवृत्त कायम करणे.

---

वाचा क्र.१ व २ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

दि.०९/०८/२०२४ शुक्रवार रोजी सकाळी- ११.३० वाजता संपन्न झालेल्या सभा क्र.२४ चे कार्यवृत्त कायम करणेस मंजूरी देण्यात येत आहे.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.२५** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०२** **प्रशासक ठराव क्र :-१५७** **दिनांक :-१२/०९/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. शहर अभियंता,सार्व.बांधकाम विभाग यांचेकडील प्रस्ताव जा.क्र./सार्व.बांधकाम विभाग/९६३/२०२४-२५ दि.२१/०८/२०२४
३. सहाय्यक आयुक्त यांचा दि.०९/०८/२०२४ चा अभिप्राय
४. उपायुक्त यांचा दि.१२/०८/२०२४ चा अभिप्राय
५. मुख्य लेखापरीक्षक यांचा दि.१३/०८/२०२४ चा अभिप्राय

**विषय :-** NCAP योजने अंतर्गत प्रभाग क्र.११ पिंप्राळा गट नं.१५५ च्या ओपनस्पेस मध्ये ग्रीन स्पेस विकसित करणे.

---

वाचा क्र.१ व शहर अभियंता,सार्व.बांधकाम विभाग यांचा वाचा क्र. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

NCAP योजने अंतर्गत प्रभाग क्र.११ पिंप्राळा गट नं.१५५ च्या ओपनस्पेस मध्ये ग्रीन स्पेस विकसित करणे या कामात सदर खुल्या जागेस झाडांच्या संरक्षणासाठी चेनलिंग फेन्सिंग करणे, ग्रीन स्पेस तयार करणे (झाडे लावणे) तसेच बोअरिंग ची व्यवस्था करणे या कामाचा समावेश करण्यात आलेला आहे. तरी सदर कामी महाराष्ट्र राज्य दरसुची सन २०२२-२३ नुसार अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. उक्त कामी अंदाजपत्रकीय रक्कम रु.३१,९९,५५०/- मात्र खर्च अपेक्षित असुन पूढील तांत्रिक तथा प्रशासकीय मान्यता मिळणेसाठी शहर अभियंता,सार्व.बांधकाम विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.२५** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०३** **प्रशासक ठराव क्र :-१५८** **दिनांक :-१२/०९/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. शहर अभियंता,सार्व.बांधकाम विभाग यांचेकडील प्रस्ताव जा.क्र./बांधकाम/१०७३/२०२४-२५ दि.०५/०९/२०२४

३. सहाय्यक आयुक्त(घनकचरा/आरोग्य विभाग) यांचा दि.२२/०८/२०२४ चा अभिप्राय

४. उपायुक्त(घनकचरा/आरोग्य विभाग) यांचा दि.२३/०८/२०२४ चा अभिप्राय

५. मुख्य लेखापरीक्षक यांचा दि.२३/०८/२०२४ चा अभिप्राय

६. उपायुक्त(सा.प्र.) यांचा दि.२३/०८/२०२४ चा अभिप्राय

**विषय :-** जळगांव शहर महानगरपालिकेचे कचरा डंपीग ग्राऊंड येथील साचलेल्या कचऱ्याचे Biomining करणेबाबत.

---

वाचा क्र.१ व शहर अभियंता,सार्व.बांधकाम विभाग यांचा वाचा क्र. २ ते ६ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जळगांव शहर महानगरपालिकेचे कचरा डंपीग ग्राऊंड येथील साचलेल्या कचऱ्याचे Biomining करणे कामी जळगांव शहरातील कचरा Dumping Ground वरील कचऱ्याची विल्हेवाट कामी clearance of Dumpsite Area by scientific sorting segregation & disposal of existing dump west & upcoming daily wet dray waste for the establishment of proposed processing unit as per approved SBM 2.0 DPR at Jalgaon Aavane G. no 864 jalgaon (work as per SWM rule 2016) वरील प्रमाणे काम करणे वक आहे. पूर्वी या ठिकाणी साचलेल्या कचऱ्यापैकी ५०% कचऱ्याचे Bio-mining करण्यात आलेले होते या ठिकाणी शहरातील कचरा दररोज साधरण 290 M.T.DUMP केला जात असतो. पुर्वीचा शिल्लक असलेला कचरा व दररोज नव्याने येणारा कचरा अशा संपूर्ण कचऱ्याचे मोजमाप R.R.Engineering यांचेकडुन निविदा प्रक्रिया राबवुन करणेत आलेले आहे. सदरचे मोजमाप शासकीय अभियांत्रिकी महाविदयालय जळगांव यांचेकडुन पत्र क्रं.GCOEJ/Civil/consultancy/२०२४/२२३७ दि.१६/०८/२०२४ अन्वये प्रमाणीत करण्यात आलेले आहे. मोजमापानुसार दि.१६/०७/२०२४ पर्यंत या ठिकाणी २२६७४६.४९७५Cu.m. कचरा साचलेला आहे. या कचऱ्यावर Bio-mining प्रक्रिया करणे आवश्यक आहे. तसेच कचरा ट्रान्सपोर्टेशन DPR २.० नुसार दररोज येणारा कचरा २८३.९१ M.T. (Sheet attached) नुसार पुढील सहा महीन्यासाठी (१८० दिवस) जमा होणारा कचरा

२८३.९१ - ९०% Density प्रमाणे ३१५.४६ Cam/day

३१५.४६X१८० Days = ५६७८२.८०cum.

या प्रमाणे एकुण ५६७८२.८०cum. कचऱ्यावर प्रक्रिया करावी लागणार आहे. सदरचा प्रस्ताव शासनास पाठवणे बाबत कार्यवाही करावी लागणार आहे. सदरचा प्रस्ताव शासनास पाठवणे बाबत कार्यवाही करणे या ठिकाणी या जागेला Compound Wall व Cement roads lichet tank, drainage arraparent या कामांचे कार्यादेश मक्तेदारास देण्यात आलेले आहेत मात्र सदरचे साचलेल्या कचऱ्याअभावी कामे सुरु करता येत नसल्याने या कचऱ्याचे नियमानुसार विघटन होणे आवश्यक आहे. करीता या कामाचे अंदाजपत्रक मजीप्रा राज्यस्तरीय व्यवस्थापन दरसुची सन २०२३-२४ नुसार बनवलेले असून या कामी अंदाजित रक्कम रु.१४,३७,२१,९७८/- मात्र खर्च

अपेक्षित आहे. सदर प्रस्तावास प्रशासकीय मान्यता मिळणेस व शासनाचे निर्देशानुसार सदरचे अंदाजपत्रकास मजीप्रा जळगांव यांची तांत्रिक फी १% प्रमाणे १४,३७,२२०/- मात्र मजिप्रा यांना अदायगी होणेस व सदरचा प्रस्ताव तांत्रिक मान्यतेकरीता महाराष्ट्र जिवन प्राधिकरण विभाग यांच्याकडेस पाठविण्यास मान्यता मिळणेसाठी शहर अभियंता,सार्व.बांधकाम विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.२५** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०४** **प्रशासक ठराव क्र :-१५९** **दिनांक :-१२/०९/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. शहर अभियंता,सार्व.बांधकाम विभाग यांचेकडील प्रस्ताव जा.क्र./बांधकाम/१०८९/२०२४-२५ दि.०९/०९/२०२४

३. सहाय्यक आयुक्त(बांधकाम) यांचा दि.३०/०७/२०२४ चा अभिप्राय

**विषय :-** शासनाच्या रक्कम रु.१००.०० कोटी निधी अंतर्गत शहरातील विविध भागातील रस्त्यांचे कॉक्रीटीकरण करणे चे कामे सार्व.बांधकाम विभाग मार्फत करण्यास या पुर्वीच ४२ कामांना ना हरकत दाखला देण्यात आलेला आहे त्यापैकी ०८ कामे रद्द झालेले असल्याने नविन ०४ कामांना ना-हरकत दाखला देण्याबाबत.

---

वाचा क्र.१ व शहर अभियंता,सार्व.बांधकाम विभाग यांचा वाचा क्र. २ ते ३ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या परिक्षेत्रात अधिसुचित विशिष्ट नागरी सेवा व सुविधा पुरविण्यासाठी शासनाने शासन निर्णय क्रं.मनपा-२०२३/प्र.क्रं.२३६/भाग-३/२/नवि-१६ मंत्रालय, मुंबई दि.०५ एप्रिल २०२३ अन्वये रक्कम रु.१००.०० कोटी अनुदान ४२ कामांकरीता मंजुर करण्यात आलेले आहे. सदर कामे करण्याकरीता सार्व.बाधंकाम विभाग कार्यान्वीत यंत्रणा असल्याने सार्व.बांधकाम विभाग,जळगांव यांना दि.३०/०६/२०२३ रोजी ना-हरकत दाखला देण्यात आलेला आहे.

सार्वजनीक बांधकाम विभाग अंतर्गत आवक क्रं.९३६ दिनांक १०/०६/२०२४ नुसार उपविभागीय अधिकारी, सार्वजनीक बांधकाम उपविभाग, जळगांव यांचेकडील पत्र जावक क्रं.साबां (बांध)उविज/८८८/२०२४ दिनांक ०६/०६/२०२४ प्राप्त असुन जळगांव महानगरपालिका क्षेत्रातील १००.०० कोटीच्या कामांमधील प्रभाग क्रं.०७ मधील काही मंजुर रस्त्यांऐवजी त्या प्रभागातील इतर काही रस्ते करावयाचे असल्याबाबत नमुद केलेले आहे. तरी उपरोक्त संदर्भीय पत्रामधील टेबल क्रं.०१ मधील अनु.क्रं.०१ ते ०८ रस्ते अमृत योजने अंतर्गत दुरुस्त करण्यात आल्याने प्रभाग क्रं.०७ मधीलच लगतच्या परिसरामधील टेबल क्रं.०२ मधील ०१ ते ०४ रस्ते करण्याकरीता ना-हरकत अपेक्षीलेली आहे.

तरी उपरोक्त पत्रानुसार टेबल क्रं.०२ मधील अनु.क्र०१ ते ०४ इ. नमुद रस्ते नव्याने करण्यास हरकत नसुन उपविभागीय अधिकारी, सार्वजनीक बांधकाम उपविभाग,जळगांव यांना खालील अटी शर्तीच्या अधीन राहुन ना-हरकत दाखला देण्यास हरकत नसावी.

टेबल क्रं.०१

| अ.क्रं. | कामाचे नांव (सा.बा.विभाग जळगांव यांच्या मार्फत रद्द कामे) कॉंक्रीटीकरण करणे |
|---|---|
| १ | फॉरेस्ट कॉलनी ते डॉ.महेश्वरी हॉऊस ते ललवाणी |
| २ | चंद्रप्रकाश भवन ते टी व्ही जोशी हॉऊस |
| ३ | हरीभाऊ हॉऊस ते चंद्रकांत सोनार |
| ४ | विशाल मधुकर जोगी ते राजू पहीलवान |
| ५ | लक्ष्मण कौतिक ठोसर ते जि डी वाघ |
| ६ | मनोज केदारनाथ भदाने ते आर व्ही फालक |
| ७ | सोपान झुनझुनवाला ते डॉ एन बी नवाल |
| ८ | डॉ.नवाल यांचे घर ते के के लढ्ढा यांचे घर |

टेबल क्रं.०२

| अ.क्रं. | कामाचे नांव (सा.बा.विभाग जळगांव यांच्या मार्फत प्रस्तावित कामे) कॉंक्रीटीकरण करणे |
|---|---|
| १ | मधुबन अपार्टमेंन्ट ते नरेंद्र चौधरी |
| २ | प्रकाश नेमा चौधरी ते हेमंत कुलकर्णी |
| ३ | ए पी चौधरी ते प्रमोद जिवराम नारखेडे |
| ४ | भारती मुरलीधर नेमाडे ते व्ही एस चौधरी |

टेबल क्रं.०२ मधील एकुण ०१ ते ०४ कामे करण्याकरिता ना-हरकत दाखला खालील अटी-शर्तीच्या अधिन राहुन देण्यास व त्या नंतर सदर कामांचा प्रस्ताव पारित झालेला ठराव सार्वजनीक बांधकाम विभागाकडेस देण्यास मान्यता मिळणेसाठी शहर अभियंता,सार्व.बांधकाम विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

१. प्रमाणित करण्यात येते की, खाली नमुद कामाची जागा मनपा कब्जेवहीवाटीतील आहे.
२. प्रमाणित करण्यात येते की, खाली नमुद काम आपल्या कार्यालयाकडून पूर्ण झाल्यानंतर मनपाकडे हस्तांतरीत झाल्यानंतर कामाची दोष दायीत्व पुर्ण झाल्यानंतर त्याची देखभाल व दुरुस्ती मनपा जळगांव मार्फत करण्यात येईल.
३. प्रमाणित करण्यात येते की, खाली नमुद प्रस्तावित केलेले काम कोणत्याही योजनेतुन मंजुर अथवा प्रस्तावित नाही.
४. प्रमाणित करण्यात येते की, खाली नमुद प्रस्तारवित केलेल्या कामांची जागा अतिक्रमण विरहीत आहे.
५. ज्या रस्तयांवर भुमिगत गटारींचे काम झालेले नाही अश्या रस्त्यांच्या कॉंक्रीटीकरणाच्या प्रस्तावात सदर रस्त्यावर भविष्यात भुमिगत गटारीसाठी खोदकाम करण्यात येणार असलेने त्यासाठी रस्त्यांचे नुकसान होणार नाही अश्या प्रकारचे नियोजन करणे व त्याकरीता आवश्यक बाबींचा समावेश अंदाजपत्रकीय प्रस्तावात करणे आवश्यक राहील.
६. रस्त्यावर मलनिस्सार योजनेचे असलेली मुख्य चेंबर व घरजोडणी चेंबर कोणत्याही परिस्थितीत रोड खाली दबाई होणार नाही याची दक्षता घ्यावी. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमानुसार पाणी पुरवठा व मलनिस्सारण सेवा अत्यावश्यक सेवेत समाविष्ट असल्याने अशी कृती नियमांचे उल्लंघन करणारी ठरेल. रत्याखाली दबाई झाल्यास आपण नियुक्त केलेले मक्तेदार यांनी तात्काळ स्वखर्चाने पुर्ववत व सुस्थितीत करण्याचे नियोजन ठेवणे आवश्यक राहील याची नोंद घ्यावी.
७. सदर रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करण्यासाठी रोड स्क्रपींग करणे, खोदकाम करणे, हि कामे करीत असतांना जलवाहीनीची अथवा नागरीकांचे नळ संयोजनचे कोणतेही नुकसान झाल्यास, तुट फुट झाल्यास, त्याची तात्काळ दुरुस्ती करणे आवश्यक राहील.
८. रस्त्याचे काम करतांना त्या रस्त्यावरील भुमिगत मलनिस्सारण योजनेची चेंबर असल्यास त्याची तुट फुट होणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक राहील, तसेच सदर चेंबर रस्त्याच्या पृष्ट भागाशी समतल करणे आवश्यक राहील व त्यासाठी अंदाजपत्रकात देखिल तरतुद करणे आवश्यक राहील.
९. प्रस्तावातील कोणत्याही रस्त्याचे काम सुरु करण्यापुर्वी सात दिवस आधी सुचित करणे आवश्यक राहील, त्यामुळे त्या रस्त्यावारील पाईपलाईन दुरुस्ती नळ संयोजन अथवा इतर आवश्यक कामे मनपा मार्फत पुर्ण करुन घेणे शक्य होईल.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ३ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.२५** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०५** **प्रशासक ठराव क्र :-१६०** **दिनांक :-१२/०९/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. प्रशासन अधिकारी, मनपा शिक्षण मंडळ यांचेकडील प्रस्ताव जा.क्र./२३३ दि.०४/०९/२०२४

३. उपायुक्त यांचा दि.२९/०८/२०२४ चा अभिप्राय

४. अतिरिक्त आयुक्त यांचा दि.२९/०८/२०२४ चा अभिप्राय

**विषय :-** शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय क्र./सुरक्षा २०२४/प्र.क्र.२०४३/एस.डी-४/ दि.२१/०८/२०२४ चे निर्णयाच्या अनुषंगाने व म.आयुक्त यांचे दि.२६/०८/२०२४ चे आढावा बैठकीतील सूचना वजा आदेशानुसार मनपा संचलित प्राथमिक शाळा परिसरात सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून शाळानिहाय सी.सी.टीव्ही कॅमेरे खरेदी करुन बसविणे संदर्भात.

---

वाचा क्र.१ व प्रशासन अधिकारी, जळगांव शहर महानगरपालिका शिक्षण मंडळ यांचा वाचा क्र. २ ते ४ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

शालेय विदयार्थ्यांच्या शिक्षणाबारोबरच त्यांच्या सुरक्षेचा मुद्दा अत्यंत महत्वपूर्ण आहे. शालेय विदयार्थ्यांच्या विशेषत: मुलींच्या सुरक्षीततेसाठी उपाय योजनेबाबत शासन निर्णय निर्गमीत करण्यात आलेला असून शासन निरर्णयाचे अनुषंगाने व आयुक्त, मनपा जळगांव यांचे दि.२२/०८/२०२४ रोजीच्या बैठकीतील सूचनांच्या अनुषंगाने महानगरपालिका संचलीत प्राथमिक व माध्यमिक शाळा व शाळा परिसरात सी.सी.टीव्ही कॅमेरे बसविणे आवश्यक आहे. त्याबाबतची शाळांकडून प्राप्त अहवालानुसार खाली दिलेप्रमाणे शाळानिहाय सी.सी.टीव्ही कॅमेरांची आवश्यकता आहे.

| अ.क्रं. | शाळेचे नांव | सी.सी.टीव्ही संख्या |
|---|---|---|
| १ | मनपा केंद्र शाळा क्र.१, जळगांव | ०३ |
| २ | मनपा केंद्र शाळा क्र.२, जळगांव | ०७ |
| ३ | मनपा केंद्र शाळा क्र.५, जळगांव | ०३ |
| ४ | मनपा केंद्र शाळा क्र.१०, जळगांव | ०५ |
| ५ | मनपा केंद्र शाळा क्र.११, जळगांव | ०६ |
| ६ | मनपा केंद्र शाळा क्र.१२, जळगांव | ०५ |
| ७ | मनपा केंद्र शाळा क्र.१३, जळगांव | ०३ |
| ८ | मनपा केंद्र शाळा क्र.१५, जळगांव | ०६ |
| ९ | मनपा केंद्र शाळा क्र.१७, जळगांव | ०३ |
| १० | मनपा केंद्र शाळा क्र.२ व १९, जळगांव | ०५ |
| ११ | मनपा केंद्र शाळा क्र.२३, जळगांव | ०४ |
| १२ | मनपा केंद्र शाळा क्र.२४, जळगांव | ०४ |
| १३ | मनपा केंद्र शाळा क्र.३२, जळगांव | ०४ |
| १४ | मनपा केंद्र शाळा क्र.३५, जळगांव | ०५ |
| १५ | मनपा केंद्र शाळा क्र.३६, जळगांव | ०५ |
| १६ | मनपा केंद्र शाळा क्र.३८, जळगांव | ०३ |

| | | |
|---|---|---|
| १७ | मनपा केंद्र शाळा क्र.४१, जळगांव | ०४ |
| १८ | मनपा केंद्र शाळा क्र.४८, जळगांव | ०५ |
| १९ | मनपा केंद्र शाळा क्र.५०, जळगांव | ०३ |
| २० | मनपा केंद्र शाळा क्र.५४, जळगांव | ०३ |
| २१ | मनपा केंद्र शाळा क्र.५५, जळगांव | ०३ |
| २२ | मनपा केंद्र शाळा क्र.५६, जळगांव | ०२ |
| २३ | मनपा उर्दू हायस्कुल नं.१, जळगांव | ०७ |
| २४ | मनपा उर्दू हायस्कुल नं.२, जळगांव | ०३ |
| २५ | मनपा रामलालजी चौबे कन्या माध्य.विदयालय,जळगांव | ०२ |
| २६ | मनपा माध्यमिक विदयालय विवेकानंदनगर | ०३ |
| | एकूण सि.सि.टीव्ही कॅमेरा संख्या - | १०६ |

उपरोक्त मागणीनुसार १०६ सी.सी.टीव्ही कॅमेरांची आवश्यकता असून जळगांव शहर महानगरपालिकेच्या निधीतून महानगरपालिका संचलीत प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये विदयार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने सी.सी.टीव्ही कॅमेरे खरेदी करुन बसविणेकामी अंदाजीत अपेक्षित खर्च हा २० लाख रुपये असा येणार आहे. त्याकरीता सदरचा खर्च महिला व बालकल्याण विभागाचे ५% राखीव निधीमधून मनपाच्या अंदाजपत्रकीय शिर्षकाखाली करणेस व सदरच्या प्रस्तुत प्रकरणावर पुढील कार्यवाही कार्यालय नियंत्रण भांडार विभाग यांचेकडून करुन घेणेकरिता मान्यता मिळणेसाठी प्रशासन अधिकारी, जळगांव शहर महानगरपालिका शिक्षण मंडळ यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ४ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.२५** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०६** **प्रशासक ठराव क्र :-१६१** **दिनांक :-१२/०९/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. सहाय्यक नगररचनाकार यांचा दि.०६/०९/२०२४ चा अभिप्राय
३. सहाय्यक संचालक, नगररचना विभाग यांचेकडील प्रस्ताव जा.क्र./न.र./६८६ दि.०६/०९/२०२४

**विषय :-** मौजे निमखेडी गट नं.११८/२ब, या जागेवरील आरक्षण क्र.३९ साईट फॉर एक्साईज डिपार्टमेंट या आरक्षणा बाबत.

---

वाचा क्र.१ व सहाय्यक संचालक, नगररचना विभाग, महानगरपालिका जळगांव यांचा वाचा क्र. २ ते ३ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जळगांव शहराकरीता शासनाने अधिसुचना क्रं क्र.टी.पी.एस.३५९९/७३८/ सी.आर. १४२ (ए) युडी- ९ दि.११/०२/२००२ अन्वये मंजुर विकास योजना (वाढीव हद्द) मंजुर केलेली असुन उक्त विकास योजना दि.०७/०४/२००२ पासुन अंमलात आहे तसेच उर्वरीत वगळलेल्या भागाची विकास योजना (इ.पी) शासनाने अधिसुचना क्र.टी.पी.एस.३५०३/४९३/सी.आर-१०२ (ए) /०३ युडी-९ दि.१०/०८/२००४ द्वारे मंजुर केलेली आहे.व ती दि.०१/१०/२००४ पासुन अंमलात आलेली आहे. उक्त विकास योजनेत, मौजे निमखेडी गट नं.११८ पै. ही जागा आरक्षण क्र.३९, साईट फॉर एक्साईज डिपार्टमेंट, या प्रमाणे आरक्षित आहे. या आरक्षणा खालील एकुण क्षेत्र १.७३ हे. प्रस्तावित होते. तथापि,वगळलेल्या भागाची विकास योजन मंजुर करतांना आरक्षणाचे क्षेत्र १.१३ हे. एवढे प्रस्तावित आहे.

प्रकरणाची पार्श्वभूमी :- शासन पत्र क्र.टीपीएस- ३५२२/५९९/२०२२/नवि-०९,दि.२३/०३/२०२२ चे पत्रानुसार शासनाकडून उपरोक्त जागेतील आरक्षण वगळणे बाबत या कार्यालयाचा अहवाल अपेक्षिला होता. तसेच राज्य उत्पादन शुल्क,जळगाव यांचेकडील पत्र क्र.बिएलडी/टीपीएस -११२०२२/अधी.३६४,दि.३१/०३/२०२३ चे पत्रानुसार अधिक्षक राज्य उत्पादन शुल्क यांनी मौजे निमखेडी गट नं.११८/२ब क्षेत्र १ हे.६६ आर या पैकी १ हेक्टर वगळता ६६ आर क्षेत्र संपादीत करणे बाबतची प्रक्रीया सुरु करण्यात यावी या प्रमाणे या कार्यालयास विनंती केलेली आहे. त्या अनुषंगाने,अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांना महानगरपालिका,नगररचना विभागाकडिल पत्र जा.क्र/नर/५२५, दि.०९/०६/२०२३ चे पत्रान्वये सदर आरक्षित जागेचे समुचीत प्राधिकरण 'राज्य उत्पादन शुल्क' विभागच असल्याने भुसंपादनाची कार्यवाही त्यांनी त्यांचे स्तरावरुन करावी. या प्रमाणे कळविलेले आहे.

मे.एस.एस.रियालिटीझ भागीदार तर्फे मोहम्मद शाकीर व इतर यांचा दि.०८/११/२०२३ रोजीच्या अर्जानूसार जागा मालक यांनी उपरोक्त आरक्षणा खालील मौजे निमखेडी गट नं.११८/२ब क्षेत्र १ हे ६० आर पैकी १ हेक्टर जागा वगळण्याची कार्यवाही करणे बाबत विनंती केलेली आहे. त्या अनुषंगाने मा.प्रशासक ठराव क्र.२०,दि.२३/११/२०२३ नुसार, 'सदर आरक्षणाचे समुचित प्राधिकरण राज्य उत्पादन शुल्क असल्याने, आवश्यक असलेले आरक्षण अबाधीत ठेवुन उर्वरीत आरक्षण वगळणे बाबतची कार्यवाहीचे अधिकार महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५० अन्वये राज्य शासनास आहेत. त्यामुळे आवश्यक असलेल्या आरक्षणाचे स्थान निश्चिती करुन, राज्य उत्पादन शुल्क विभागास, शासन स्तरावरुन आदेश करणे तसेच शासनस्तरावरुन पुढील कार्यवाही करणेस हरकत नाही.' या प्रमाणे ठराव पारीत करण्यात येऊन त्या ठरावाच्या अनुषंगाने महानगरपालिका,नगररचना विभागाकडिल

पत्र जा.क्र/नर/१२५४,दि.२९/११/२०२३ व पत्र जा.क्र/नर/१५४६,दि.१२/०२/२०२४ अन्वये शासनास कळविण्यात आलेले आहे.

आता राज्य उत्पादन शुल्क,जळगाव यांचेकडील पत्र क्र.बिएलडी/टिपीएस-११२०२४/१११२/९७८, दि.२५/०६/२०२४. चे पत्रानुसार अधिक्षक राज्य उत्पादन शुल्क यांनी, मा.अप्पर मुख्य सचिव राज्य उत्पादन शुल्क यांना, 'मा.जिल्हाधिकारी जळगाव यांचेकडील आदेश क्र.जमिन/३/२८/प्र.क्र./ /२०२४ दि.२४/०६/२०२४ अन्वये जळगाव सि.स.नं.६२६६ मधील ८०००.०० चौ.मी जागा वितरीत करण्यात आलेली असल्याने, मौजे निमखेडी गट नं.११८/२ब मधील ०.६६ हे. क्षेत्र, रु.५.८७ कोटी इतका अंदाजित मोबदला देवुन संपादीत करण्याची आवश्यकता नाही असे या कार्यालयाचे मत आहे'. या प्रमाणे कळवुन त्याची प्रत महापालिकेस सादर केलेली आहे. त्याच प्रमाणे मे.एम.एस.रियालिटीझ यांचे तर्फे भागीदार मोहम्मद मुश्ताक शाकीर यांचा दि.०२/०७/२०२४ रोजीच्या पत्रान्वये म.प्रा.व न.र.अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वयेची नोटीसनुसार, मे.एम.एस.रियालिटीझ यांचे तर्फे भागीदार मोहम्मद मुश्ताक शाकीर, यांनी 'उक्त आरक्षणा खालील निमखेडी गट नं.११८/२ब या मधील त्यांच्या मालकीचे क्षेत्र १.०६ हे. ही जागा विहीत मुदतीत संपादीत केली नाही या कारणास्तव सदरची जागा आरक्षण मुक्त करणेबाबत कार्यवाही करावी, या प्रमाणे म.प्रा.व न.र.अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वयेची नोटीस महानगरपालिकेस बजाविलेली आहे.

राज्य उत्पादन शुल्क,जळगाव यांचेकडील पत्र क्र.बिएलडी/टिपीएस-११२०२२/१११२/अधी/१४७९, दि.०२/०९/२०२४ चे पत्रानुसार,अधिक्षक राज्य उत्पादन शुल्क यांनी 'म.जिल्हाधिकारी जळगाव यांचे आदेश जमीन/३/२५/२८/प्र.क्र/ /२०२४ दि. /०५/२०२४ अन्वये जळागाव सि.स.नं.६२६६ मधील ८० आर जागा राज्य उत्पादन शुल्क विभागास विनामुल्य प्राप्त झालेली असल्याने, राज्य उत्पादन शुल्क विभाग़ासाठी मौजे निमखेडी,ता.जि.जळागाव येथील जागा मोबदला देऊन संपादीत करण्याची आवश्यकता नाही.' असे त्यांना प्राप्त शासन पत्र क्र.बी.जी.टी.१०२२/प्र.क्र.-२५७/राउशु-१ दि.२३/०८/२०२४ च्या पत्राच्या अनुषंगाने कळवले आहे.

तरी वरील अहवालात नमुद केल्यानुसार,

१) अधिक्षक राज्य उत्पादन शुल्क यांनी त्यांच्या विभागाकरीता विनामुल्य जागा प्राप्त झाल्याने त्यांचे करीता आरक्षित असलेल्या जागेची मोबदला देऊन भुसंपादना करण्याची आवश्यकता नाही.या प्रमाणे कळविलेले आहे.

२) जागा मालक यानी सदर जागा आरक्षण मुक्त करणे करीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये नोटीस दिलेली आहे.

३) प्रस्तुत आरक्षणाचे समुचीत प्रधिकरण राज्य उत्पादन शुल्क विभाग असुन जळगाव शहर महानगरपालिका,जळगाव समुचीत प्राधिकरण नाही.

उपरोक्त बाबींचा विचार करता व जागा मालक यांच्या मागणीचा विचार करता मौजे निमखेडी गट नं.११८ पैकी या जागेवरील आरक्षण क्र.३९ (साईट फॉर एक्साईट डीपार्टमेंट),निमखेडी गट नं.११८/२ब मधील १.०६ हे. यासह संपुर्ण १.१३ हे. क्षेत्र ही जागा आरक्षण मुक्त करावयाची झाल्यास, याबाबत ची कार्यवाही करण्याचे अधिकार, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५० अन्वये शासनास आहेत. तरी शासनाने सदर जागेच्या आरक्षणा बाबत निर्णय घेऊन जागा आरक्षण मुक्त केल्यास त्याबाबत महापालिकेची कोणतीही हरकत नाही. याप्रमाणे अहवाल शासनास सादर करणेस मान्यता मिळणेसाठी सहाय्यक संचालक, नगररचना विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ३ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.२५** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०७** **प्रशासक ठराव क्र :-१६२** **दिनांक :-१२/०९/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग यांचेकडील प्रस्ताव जा.क्र./आस्था/१९२४२०२४-२५ दि.११/०९/२०२४

३. उपायुक्त (सा.प्र.) यांचा दि.२९/०८/२०२४ चा अभिप्राय

**विषय :-** श्रीमती शितल प्रकाश शंभरकर, लिपीक पाणी पुरवठा विभाग, यांची बीड जिल्हा परिषद येथे बदलीकरीता ना-हरकत दाखला व ठराव मिळणेबाबत.

---

वाचा क्र.१ व आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग यांचा वाचा क्र. २ ते ३ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

श्रीमती शितल प्रकाश शंभरकर, लिपीक पाणी पुरवठा विभाग यांचा दि.२४/०८/२०२४ चा बीड जिल्हा परिषद येथे बदलीकरीता ना-हरकत दाखला व ठराव मिळणेबाबतचा अर्ज तसेच यासंदर्भात त्यांनी दि.२१/०८/२०२४ रोजी पती-पत्नी एकत्रीकरणानुसार बदली प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी, बीड जिल्हा परिषद यांना पाठविणेबाबत दिलेला अर्ज व कार्यासन अधिकारी, नवि-२५ यांचे कडील क्रमांक जमपा-२०२२/सं.क्र./६७९/नवि-२५ दि.२३/०८/२०२४ चे पत्रात श्रीमती शितल प्रकाश शंभरकर यांच्या जिल्हा परिषद बीड येथे बदली संदर्भात म.न.पा.ठराव व आवश्यक कागदपत्र तसेच ना-हरकत प्रमाणपत्रासह शासनास अहवाल सादर करणेबाबत नमुद असुन यानुसार प्रशासक ठराव करणे आवश्यक आहे.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी(सा) जिल्हा परिषद बीड यांचे क्र.साप्रवि/कावि/३५६७/२०२४ दि.२८/०८/२०२४ चे पत्रानुसार श्रीमती शितल प्रकाश शंभरकर यांचा आंतर जिल्हा बदलीबाबतचा विहित नमुन्यात प्रस्ताव मनपा कार्यालयाकडून जिल्हा परिषदकडे सादर करणेबाबत पत्रात नमुद केलेले आहे.

प्रशासक ठराव झालेनंतर नगरविकास विभाग, मंत्रालय नवि-२५ व जिल्हा परिषद बीड येथे पाठविणे आवश्यक असल्यामुळे शासन नियमानुसार विहित बाबींची पूर्तता करणेस अधीन राहून सदर आंतर जिल्हा बदली प्रस्तावास मान्यता देण्यासाठी आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ३ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.२५** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०८** **प्रशासक ठराव क्र :-१६३** **दिनांक :-१२/०९/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचेकडील प्रस्ताव जा.क्र./बांधकाम/११०२/२०२४-२५ दि.१०/०९/२०२४

३. अतिरिक्त आयुक्त यांचा दि.०५/०९/२०२४ चा अभिप्राय

**विषय :-** महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान रस्ते प्रकल्प अंतर्गत सोबतच्या यादीनुसार ०१ ते ६८ कामांसाठी १००% निधी मागणी करण्यास व आवश्यक प्रमाणपत्र सादर करणे बाबत.

---

वाचा क्र.१ व शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचा वाचा क्र. २ व ३ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जळगांव शहर महानगरपालिका क्षेत्रात रस्त्यांचा विकास करण्याकामी राज्य शासनामार्फत दि.१६/०८/२०१८ च्या परीपत्रकानुसार रक्कम रु.१००.०० कोटी मात्रला महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान रस्ते प्रकल्प अंतर्गत तत्वत: मान्यता देण्यात आलेली होती. त्यानुसार महाराष्ट्र शासन निर्णय क्रं. महाराष्ट्र शासन निर्णय क्र.नगरो-२०१९/प्र.क्र.२२/न.वि.३३ दि.०१ ऑगस्ट, २०१९ अन्वये रक्कम रु.४१.९५ कोटीच्या किमतीच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. एकुण मंजुर रक्कम रु.४१.९५ कोटी पैकी नगरविकास विभागाकडील पत्र क्रं.नगरो-२०२१/प्र.क्र.-१४(भाग-१)/ नवि-३३ दि.२२ मार्च २०२२ अन्वये रक्कम रु.३८.२८ कोटी किमतीच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. व त्यानुसार ७०% अनुदान रक्कम रु.२६.७९६ कोटी हे राज्य शासनाकडुन अनुज्ञेय असुन ३०% रक्कम रु.११.४८४ कोटी मात्र स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजेच मनपा जळगांव यांनी खर्च करणे बंधनकारक आहे. त्यानुसार या कामी कार्यान्वीय यंत्रणा सार्व.बांधकाम विभाग,जळगांव असुन त्या कार्यालया मार्फत या कामांची निविदा प्रक्रिया राबवून मक्तेदारास कार्यादेश निर्गमित करण्यात आलेले आहेत व मक्तेदारा मार्फत कामे सुरु असुन प्रगती पथावर आहे.

शासना मार्फत जळगांव शहर महानगरपालिका करिता महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान रस्ते विकास प्रकल्प अंतर्गत मंजुर रक्कम रुपये १००.०० कोटी पैकी ३८.२८ कोटी रक्कम वगळता उर्वरीत रक्कम रु.६१.७२ कोटी रक्कमे अंतर्गत जळगांव शहरातील उर्वरीत रस्त्यांची कामे करण्याकरीता रक्कम रु.७२.४४ कोटी रक्कमेचा प्रस्ताव तयार करण्यात आला असुन त्यात समाविष्ठ असलेल्या अ.क्रं.०१ ते ६८ कामांची यादी सोबत जोडण्यात आली आहे. (त्यानुसार ७०% राज्य शासन हिस्सा रक्कम रु.५०.७० कोटी व ३०% मनपा हिस्सा रक्कम रु.२१.७३२ कोटी आहे) या कामांना सार्व.बांधकाम विभाग जळगांव यांनी तांत्रिक मान्यता प्रदान करुन प्रशासकीय मान्यता मिळणेकामी नगरविकास विभागाकडेस प्रस्ताव सादर केलेला आहे. या प्रस्तावात समाविष्ठ कामाची जागा ही कब्जे वहिवाटीने मनपा मालकीची असल्याने प्रस्तावा सोबत नियमानुसार आवश्यक प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे तसेच जळगांव शहर महानगरपालिकेची आर्थीक

स्थिती बिकट असल्याने या योजने अंतर्गत मनपा हिस्सा ३०% रक्कम उभारणे शक्य नसल्याने या कामी १००% आवश्यक निधी राज्य शासना मार्फत मिळण्याकामी शासनास विनंती करण्यास व मनपा मार्फत आवश्यक प्रमाणपत्र सादर करण्यास मान्यता मिळण्यासाठी शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ३ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# JALGAON MUNICIPAL CORPORATION, JALGAON

**Meeting No.:- 25**

**Subject No.:- 08 Administrator Resolution No.163 Date 12/09/2024**

| Sr.No | Name of Work | Length (m) | Cost (Rs.) (Only Work Portion) |
|---|---|---|---|
| | **Sub-Artirial Roads** | | |
| 1 | Construction of Cement Concrete road at Daulat Nagar near Sudarshan Housing Society in Gurukripa Dairy to Kambiyat Classes Under Ward no. 13 | 330 | **1,26,34,054.44** |
| 2 | Construction of Cement Concrete road from Raj Wine Shop in Old Village Area Under Ward no.03 | 275 | **1,16,46,855.00** |
| 3 | Construction of Cement Concrete road from National Highway No. 06 at Inner Old Village to Shaktidham Mandir Devosthan at Kamdhenu Nagar Under Ward no.17 | 475 | **1,73,52,613.00** |
| 4 | Construction of Cement Concrete road at Kalinka Mata Mandir area A 1 Bharita Center in from that Old Village Road Under Ward no.03 | 300 | **1,27,12,297.00** |
| 5 | Construction of Cement Concrete Road From Shri.Jagtap's house to Shri. Ramesh Munot's house Under Ward no. at 13 | 320 | **1,17,78,278.00** |
| 6 | Construction of Cement Concrete road from Kashinath Chowk asphalt road to Pawar Sir's house Under Ward no.03 | 390 | **1,65,01,410.20** |
| | **Collector Streets** | | |
| 7 | Construction of Cement Concrete road from Ganesh Divine to Atharva Apartment, Under Ward no 07 | 200 | **71,89,928.00** |
| 8 | Construction of Cement Concrete road from Atharva Colony Ganpati Temple to Shri.Sagar Patil's house Under Ward no. 07 | 210 | **45,66,164.85** |
| 9 | Construction of Cement Concrete road at Ashababa Nagar from the house of Mr.Prakash Gajakush to Shri.Shantaram Bari's house Under Ward no.07 | 140 | **31,44,968.20** |
| 10 | Construction of Cement Concrete road at Ashababa Nagar from Mr.Barkale house to the Drain at the end Under Ward no 07 | 200 | **73,49,295.00** |
| 11 | Construction of Cement Concrete road at Shamrao Colony from Shri Ganesh Provision to Lalit Katkar's house Under Ward no 07. | 150 | **54,94,499.00** |
| 12 | Construction of Cement Concrete road at Ashababa Nagar from the house of Mr.Gopal Sakharam Patil to Mr.Vijay Mahajan's house Under Ward no 07. | 100 | **36,91,654.00** |
| 13 | Constrction of Road at Ashababa Nagar from Mr.Vijay Bhoi's house to Mr.Devare's house Under Ward no 07. | 100 | **36,38,931.00** |
| 14 | Construction of Cement Concrete road in Ganesh Park area of Group No. 86/2 at Ashababa Nagar Under Ward no 07. | 360 | **77,86,754.08** |
| 15 | Construction of Cement Concrete road from Adv. Devika R.Patil's house to Ganesh Divine Road Under Ward no. 07 | 210 | **45,77,423.13** |

| | | | |
|---|---|---|---|
| **16** | Construction of Cement Concrete road from Hanuman Mandir in Panditrao Colony to Mrs.Bharti Patil's house Under Ward no 07. | 260 | **93,51,519.00** |
| **17** | Construction of Cement Concrete road at Ashababa Nagar from the house of Mr.Ganesh Badgujar to Shri.Sadguru General Store Under Ward no 07. | 100 | **21,97,193.30** |
| **18** | Construction of Cement Concrete road at Ashababa Nagar near Mobile Tower from Shri. Dayaram Eknath Kakade to Mr.Ramesh Bhogavkar's house Under Ward no 07 | 200 | **71,89,928.00** |
| **19** | Construction of Cement Concrete road at Ashababa Nagar from the house of Mr.Prabhakar Vasant More to Shri.Pandurang Lokhande's house Under Ward no 07. | 115 | **41,58,473.00** |
| **20** | Construction of Cement Concrete road at Ashababa Nagar from Mr.Sandeep Ramu Patil's house to railway line Under Ward no.07 | 240 | **86,38,175.00** |
| **21** | Construction of Cement Concrete road at Group No. 467/2A/1 Parijat Colony From Mr. Gyandev Lokhande's house to Mr. Ramesh Palve's house Under Ward no. 13 | 75 | **11,69,270.38** |
| **22** | Construction of Cement Concrete road at Group No. 467/2A Parijat Colony From Shri.Rahul Wagh's house to Shri. Jitendra Badgujar's house Under Ward no. 13 | 120 | **18,41,606.20** |
| **23** | Construction of Cement Concrete road at Group No. 463/1+2 Sambhaji Nagar, Devendra Nagar Varuna Water Jar Factory at Shri. Sachin Sapkale house of Plot no. 07 Under Ward no.13 | 220 | **72,95,492.60** |
| **24** | Construction of Cement Concrete road at Nimkhedi Shivar Group no. 121/A/3 from Plot 13 to Plot 20 Under Ward no. 08 | 100 | **37,02,228.00** |
| **25** | Construction of Cement Concrete road at Group No. 370 K.C. Park area here in front of Mr. Temkar's house and road behind it Under Ward no. 01 | 370 | **1,35,09,577.00** |
| **26** | Construction of Cement concrte road near Mahalakshmi Park area and around Mr.Pandit Choudhary's house Under Ward no.03 | 310 | **1,13,55,699.30** |
| **27** | Construction of Cement Concerte road from National Highway at Premchand Nagar up to Shri.Prashant Warke's house and further up to old village Road Under Ward no. 03. | 310 | **1,13,40,869.00** |
| **28** | Construction of Cement Concrete road from Kashinath Nagar to Madhav town Under Ward no. 03 | 450 | **1,64,49,419.00** |
| **29** | Construction of Cement Concrete road near Sikal Ghar Shri. Balaji Temple opposite Raju Bhagwat Shinde Kasamwadi Mahadev Temple Under Ward no 06 | 420 | **1,53,60,652.00** |
| **30** | Construction of Cement Concrete Road at Group No. 342 Dutt Colony in Shivaji Nagar From Mr. Appa Ghagade's house to Shri. Arun Suryavanshi's house Under Ward no. 01 | 150 | **47,79,864.00** |
| **31** | Construction of Cement Concrete road From Shri. Sunil Thakur's house to Mr.Gobi house Under Ward no.01 | 45 | **15,87,882.60** |
| **32** | Construction of Cement Concrete road from Chhatraya Maratha Mangal Office at Shivaji Nagar to Shri. Mohan Tiwari's house Under Ward no.02 | 350 | **94,17,155.00** |
| **33** | Construction of Cement Concrete road at Ashtavinayak Chowk to Survey no. 341/1 leading to Dhanaji Kale Nagar and surrounding roads Under Ward no. 01 | 360 | **81,01,395.08** |

| | | | |
|---|---|---|---|
| **34** | Construction of cement Concrete road from Old Jalgaon Opposite Rajaram Mangal Office to Shri. Leeladhar Suresh Khadke's house to the last house in Khatwadi Under Ward no.17 | 120 | **24,75,935.60** |
| **35** | Construction of Cement Concrete road in front of Hanuman Temple at Ayodhya Nagar from Ganapati Temple to Mahadev Temple to Janged Hall Under Ward no 17 | 475 | **95,48,365.75** |
| **36** | Construction of Cement Concrete roads at area of Shanti Niketan Under Ward no 17. | 330 | **70,82,771.05** |
| **37** | Construction of cement Concrete road at Ronak Colony in front of Mr.Yashwant Patil house Under Ward no.17 | 70 | **15,71,379.10** |
| **38** | Construction of concrete road from Dadawadi Jain Temple to Vagheshwari Kirana Under Ward no.8 | 735 | **2,43,76,790.95** |
| **39** | Construction of Cement Concrete roads in the area of Shankarwadi Under Ward no.06 | 320 | **74,40,055.60** |
| **40** | Construction of Cement Concrete road from Nature Beautiful Apartments to Bhrit Center Under Ward no. 13 | 175 | **58,33,708.00** |
| **41** | Construction of Cement Concrete roads in Sunandini Park area of Gyandev Nagar Under Ward no. 13 | 520 | **1,89,80,270.00** |
| **42** | Construction of Cement Concrete roads in the area at Sagar Nagar Group No. 70/1/3 Under Ward no.03 | 370 | **1,28,44,754.10** |
| **43** | Construction of Cement Concrete road from Mr.Prashant Sawant's house to Ahilyabai Holkar Udyan Under Ward no.02 | 150 | **44,38,961.00** |
| **44** | Construction of Cement Concrete road from Mr.Subhash Thackeray's house to Gadgil Under Ward no.02 | 215 | **68,20,211.45** |
| **45** | Construction of Cement Concrete road at Dhanashree Medical to Shri. Abhiman Sapke's house Under Ward no. 03 | 290 | **1,06,25,060.00** |
| **46** | Construction of Cement Concrete road at Group No. 130 from Narayan Park to old village Road Under Ward no. 03 | 225 | **82,64,993.75** |
| **47** | Construction of Cement Concrete road at Group No. 129 From Mr.Ajay Khadke's house to Shri.Dilip Mahajan's house Under Ward no. 03 | 300 | **1,09,79,202.00** |
| **48** | Construction of Cement Concrete road at Group No. 50/2/A in Sriram Nagar area Under Ward no. 03 | 320 | **1,11,29,933.60** |
| **49** | Construction of Cement Concrete road at Group No. 118/6 , Dwarka Nagar Plot No. 51 area Under Ward no. 08 | 360 | **1,31,79,693.80** |
| **50** | Construction of Cement Concrete road at Group No. 48/1 behind old Village Petrol Pump in Omsairam Nagar area Under Ward no. 17 | 360 | **77,16,842.60** |
| **51** | Construction of Cement Concrete road from Shri. Dr.Sanjay Kale's house to Navnath temple Under Ward no.11 | 260 | **79,19,863.80** |
| **52** | Construction of Cement Concrete road from Shri. Harshal Suryavanshi's house to Durga Mata Temple Under Ward no. at 11 | 120 | **22,68,669.20** |

| | | | |
|---|---|---|---|
| **53** | Construction of Cement Concrete road at Dhakewadi Group No. 507/ Krishna Mandir Precinct near Shri.Narkhede Sir's house Under Ward no. 16 | 390 | **86,58,363.15** |
| **54** | Construction of Cement Concrete road from Amit Patil ration shop to Dr. Vani's house Under Ward no. at 13 | 175 | **59,20,060.25** |
| **55** | Construction of Cement Concrete Road at Nageshwar temple road from Shri.Jagtap's house to Shri.Vani's house under ward No.13 | 100 | **19,12,659.00** |
| **56** | Construction of Cement Concrete road from Shri.Jagtap's house to Shri.Ramesh Minod's house Under Ward no. 13 | 225 | **45,69,636.13** |
| **57** | Construction of cement concrete road in Village Group No. 02/2 in Hari Om Nagar area Under Ward no. 03 | 105 | **22,89,170.43** |
| **58** | Construction of Cement Concrete road from National Highway No. 06 at Inner Old Village to Shaktidham Mandir Devosthan at Kamdhenu Nagar Under Ward no.17 | 325 | **1,18,81,920.00** |
| **59** | Construction of Cement concrete road at Group No. 194/2 Ganesh Vihar, Pimprala Shivar From Shri.Devendra Kasar's house to Shri Ajay Mali's house.Under Ward no. 09 | 600 | **1,56,90,396.65** |
| **60** | Construction of Cement Concrete road at Bhikamchand Jain Nagar area Group No. 292/293 in Under Ward no. 08 | 375 | **1,37,26,733.00** |
| **61** | Construction of cement concrete road at Group No. 194/2 Ganesh Vihar, Pimpraia Shivar From Shri. Devendra Kasar's house to Shri. Ajay Mali's house Under Ward no. 09 | 75 | **16,54,334.88** |
| **62** | Construction of cement concrete road at Group No. 194/2 Ganesh Vihar, Pimprala Shivar From Shri.Mayur Gurav's house to Shri. Mr. Koli's house Under Ward no. 09 | 75 | **14,35,746.88** |
| **63** | Construction of cement Concrete road at Group No. 194/2 Ganesh Vihar, Pimprala Shivar From Shri.Bachhav's open space to Mr. Jayesh Rane's house Under Ward no. 09 | 70 | **15,57,645.71** |
| **64** | Construction of road at Group No. 194/2 Ganesh Vihar, Pimprala Shivar From the house of Shri. Satish Patil to Shri.Ashok Patil's house Under Ward no. 09 | 60 | **13,03,129.10** |
| **65** | Construction of road at Group No. 194/2 Ganesh Vihar, Pimprala Shivar From Shri. Yevle's house to Mr.Mayur Jaiswal's house Under Ward no. 09 | 160 | **58,60,357.00** |
| **66** | Construction of cement concrete road at Group No. 194/2 Ganesh Vihar, Shri.Pimprala Shivar from Varad Apartment to Ganesh Vihar Open Space Under Ward no. 09 | 100 | **19,31,828.50** |
| **67** | Construction of Cement Concrete road in Group No. 58/7 Laxminarayan Nagar area Under Ward No. 17 | 245 | **52,89,849.33** |
| **68** | Construction of Cement Concrete roads from Janardhan Baviskar's house to Mohan Cinema Asoda road Under Ward no.03 | 900 | **3,28,53,364.00** |
| | **TOTAL COST- Part A** | **17650** | **55,75,44,178.69** |
| | **Part-B** (QC & Testing Charges + Royalty) | | 1,41,53,432.00 |

| | | | |
|---|---|---|---|
| | Total cost **A+B** | | **57,16,97,611.00** |
| i | Insurance 1% (On work Portion) | | 55,75,442.00 |
| ii | G.S.T 18% (on Work Portion) | | 10,03,57,952.00 |
| iii | Contingency Charges 3% (on Work Portion) | | 1,67,26,325.00 |
| iv | PMC Charges 3% (on Work Portion+ QC + Royalty) | | 1,71,50,928.00 |
| v | TPTA 1% (on Work Portion+ QC + Royalty) | | 57,16,976.00 |
| vi | TS Charges 1.25% (on Work Portion+ QC + Royalty) | | 71,46,220.00 |
| | **Total Cost ( A+B+i+ii+iii+iv+v+vi)** | | **72,43,71,454.00** |
| **In Words** | **Rupees SeventyTwo Crore FourtyThree Lakh SeventyOne Thousand Four Hundred FiftyFour Only** | | |

**ADMINISTRATOR**

**JALGAON CITY MUNICIPAL CORPORATION JALGAON**